
मधमाश्यांचे झाड

पॅट्रिशिया पोलको

अनुवाद : सुजाता गोडबोले



मधमाश्यांचे झाड

पॅट्रिशिया पोलको

अनुवाद : सुजाता गोडबोले



३७ वर्षे शिक्षिका असलेली

माझी आई मेरी एलेन

आणि तिच्या बालपणीच्या मित्र-मैत्रिणी

ओले, ऐनार आणि मेरी ॲग्नेस टँडहोल्ट

यांना सप्रेम समर्पित





“आजोबा, मला वाचायचा खूप कंटाळा आला आहे. त्याऐवजी आता मला बाहेर जाऊन पळायचं आणि खेळायचं आहे.” मेरी एलेन म्हणाली.

“म्हणजे तुला आता वाचायचं नाही आहे तर! आता पळावं असं वाटतंय ना? मग मला वाटतं आता मधमाश्यांचं झाड शोधायला जाण्याची हीच योग्य वेळ आहे!” असं म्हणत आजोबा उठले, त्यांनी एक काचेची बाटली घेतली आणि डोक्यावर त्यांची आवडती टोपी घातली.

“आजोबा, मधमाश्यांचं झाड म्हणजे काय?” मेरी एलेनने विचारले.

“म्हणजे... मधमाशा जिथे आपलं घर करतात ते. तिथे त्या मध जमा करून ठेवतात... तो सगळ्यात जास्त गोड असतो.” आजोबांनी उल्हसित होऊन उत्तर दिले.

“पण आजोबा, आपल्याकडे मध आहे की ...” मेरी एलेन म्हणाली.

“हो, पण असा कुठे आहे!” आजोबा डोळे मिचकावून म्हणाले.




मेरी एलेन आणि तिच्या आजोबांनी कोट घातले आणि ते बाहेर पडले.

घराजवळची हॉलिहोकची झाडं ओलांडून ते बागेत मधमाशा जिथे फुलांच्या परागांतून मध गोळा करत होत्या तिथे पोचले. आजोबांनी त्यातील काही मधमाशा अलगद काचेच्या बाटलीत पकडल्या.

हव्या तेवढ्या मधमाशा बाटलीत पकडून झाल्यावर ते खूष होऊन हसले आणि मेरी एलेनकडे वळून म्हणाले, “आता या मधमाशा हे परागकण त्यांच्या पोळ्याकडे घेऊन जातील आणि तिथे त्यातील मध साठवतील, आणि आपण त्यांचा माग काढत तिथपर्यंत जाऊ.”

आजोबांनी मग बाटलीचं झाकण हलकेच उघडलं आणि एक मधमाशी बाहेर पडल्यावर लगेच परत बंद केलं. मधमाशी एक क्षणभर बाटलीच्या झाकणावर रेंगाळली, मग लगेच वर उडाली आणि मक्याच्या शेताकडे उडू लागली.

“चल लवकर, पळ आता!” आजोबा म्हणाले आणि ते दोघे मधमाशीच्या मागे पळू लागले.







खालच्या रस्त्यावर राहणाऱ्या गोव्हलॉक मावशी छोट्या सिल्व्हेस्टरला बाबागाडीतून फिरवत होत्या. मेरी एलेन आणि आजोबा त्यांच्यासमोरूनच पळत निघाले होते.

“आज आम्ही मधमाश्यांचं घर शोधायला निघालो आहोत!” पळता पळताच आजोबांनी ओरडून सांगितले.

“मोठी झाल्यापासून मी कधीच मधमाश्यांचं झाड शोधायला गेले नाही!” गोव्हलॉक मावशी उल्हसित होऊन म्हणाल्या, “मी पण येऊ का तुमच्याबरोबर?”

आजोबांनी खुणेनेच त्यांना ‘आमच्या मागे ये’ असे सांगितले आणि ते तिघेही पळू लागले. मक्याच्या शेतातून जाताना सिल्व्हेस्टरची बाबागाडी धक्के खात चालली होती, आणि त्याची मजा वाटून तो आनंदाने ओरडत आणि हसत होता. “क्वॅक-क्वॅक ” असा आवाज करत एक मोठं बदकही त्यांच्यामागे जाऊ लागलं.







मक्याच्या शेतातून बाहेर पडून त्यांनी चौक ओलांडला आणि आपल्या कुरकुरणाऱ्या सायकलीवरून येत असलेले ऐनार टँडहोल्ड त्यांना वळणावरच भेटले. “तुम्ही सगळे इतक्या घाईघाईने कुठे निघाला आहात?” त्यांनी विचारले.

पळता पळताच मेरी एलेनने उत्तर दिले, “मधमाश्यांच्या झाडाकडे.”

“मधमाशीच्या झाडापर्यंत तिचा पाठलाग करताय होय? ... मग मी पण येतो,” असं म्हणून त्यांनी आपल्या सायकलवर जोरजोरात पाय मारायला सुरुवात केली. त्यांच्या सायकलीच्या चाकांचा आवाज आता बदलला आणि ‘खर्रर्रर खर्रर्रर कूं...’ असा येऊ लागला. आता सगळेच पळू लागले. बाबागाडी जोरात धडधडू लागली. बदकांचा ‘क्वॅक क्वॅक’ ही वाढला आणि सर्वजण मधमाशी मागे जोरजोरात पळू लागले.

मधमाशी थोडी खाली आली, हवेतच क्षणभर थांबली, आणि त्यांच्या डोक्यावर एक गिरकी घेऊन सरळ सेंट जो नदीकडे निघाली.



जवळच ओलाव्ह लंडहेगन पेट्रा आणि डॉरमा हेर्मान या दोन सुंदर बहिणींसोबत फेरफटका मारत होता. त्याने सहज वर पहिले तर त्याला हा मोठा घोळका त्यांच्याच दिशेने येताना दिसला. “तुम्ही सगळे कुठे निघाला आहात?” त्याने लांबूनच ओरडून विचारले.

“मधमाश्यांच्या झाडाकडे!” ऐनार टँडहोल्ड ने सायकल हाकता हाकताच उत्तर दिले.


“आम्ही पण येऊ का?” सुंदर बहिणींनी विचारले.

“लवकर या. तुम्हाला पळावे लागेल .” ऐनारने सांगितले.

“चालेल. आम्ही पळू! चला निघूया!” असं म्हणत ते तिघेही त्यांच्यामागे पळू लागले.

प्रत्येकाच्या पावलांचे आणि वाहनाचे आवाज निराळे असले, तरी सर्वजण मिळून मधमाशी मागे पळू लागले.







बेर्था फिचवर्थ नुकतीच युकॉनमधील एका मोहिमेवरून परत आली होती आणि गाडी बंद पडली म्हणून रस्त्याच्या कडेला थांबली होती. नेमके सर्वजण पळत जात असतानाच तिने मान वर करून पहिले. “तुम्ही काय मधमाशी मागे निघाला आहात का?” तिने ओरडूनच विचारले. “बापरे! हे काही सोपे काम नाही! पण चांगली मजेची कामगिरी आहे. मी पण येते!” आणि ती देखील त्यांच्यामागे पळू लागली.

मधमाशी थोडी खाली आली, मग परत वर गेली आणि दिसेनाशीच झाली.

मग आजोबांनी हळूच एका मधमाशीला बाटलीतून बाहेर सोडले आणि पाठलाग परत सुरु झाला.


आनंदाने आवाज करत जाणारा हा घोळका बर्ड टॉक फेलो रिज वरून निघून थेट फेडुसीअरी लॉगड्रॉपच्या मेंढ्यांच्या कळपातच घुसला. मेंढ्या जोरजोरात बें बें करत इकडे तिकडे पळू लागल्या.

“हे काय चाललंय? तुम्ही माझ्या मेंढरांना घाबरवत आहात!” फेडुसीअरी म्हणाला.

“मधमाशांचं झाड!” कोणीतरी त्याला उत्तर दिलं.

ते ऐकताच फेडुसीअरीने आपल्या बासरीवर एक शीळ घातली, आणि तो व त्याची मेंढरं देखील या घोळक्यात सामील झाली. “काय मेंढरानो, मजा आहे ना?” आणि सगळेच पळत सुटले.





गावोगाव करमणूक करत फिरणाऱ्या तीन वादकांनी सहज पाहिलं आणि त्यांना हा मेंढरं, बाबागाडी, माणसं, सायकल असा मजेशीर घोळका त्यांच्याकडेच येत असलेला दिसला.

“बाबा, हे सगळे असे का पळताहेत?” त्यांच्यातल्या एका मुलाने आपल्या वडिलांना विचारले.

आकाशातल्या एका लहानशा ठिपक्याएवढ्या दिसणाऱ्या मधमाशीकडे बोट करून आजोबा म्हणाले, “आम्ही त्या मधमाशीच्या मागे निघालो आहोत.”

“ती आम्हाला तिच्या घराचा रस्ता दाखवते आहे!” मेरी एलेन पळता पळता म्हणाली.

“तुम्ही पण चला!” पळताना धाप लागलेली बेर्था म्हणाली.






ठप, धक, बें बें, क्वॅक, क्वॅक, थर्रर्र् कू..., हा- हू असे निरनिराळे आवाज काढत सर्वजण पळत होते! खुरांचा आवाज येत होता, मक्याच्या शेतातून सगळे पळत सुटले होते. मधमाशीचा पाठलाग करण्यात कोणाचेही इतर कुठेच लक्ष नव्हते.

ग्रेनार कडा ओलांडून ते बिशप पठारावर आले, मोठ्या थोरल्या झाडाला वळसा घालून बर्ड टॉक घळीत पोचले.






घळीतून पळत जात असताना मधमाशीने आपला वेग अचानक वाढवला आणि ती दिसेनाशी झाली. मग डंकच्या वनाशी थांबून सर्वजण दम खाऊ लागले.

शेवटची एक मधमाशी राहिलेली काचेची बाटली आजोबांनी मेरी एलेनच्या हातात दिली आणि तिने हळूच ती मधमाशी बाहेर सोडली.

आणि अर्थातच, ती सरळ उडत डंकच्या वनात शिरली.









"ते बघ मधमाश्यांचं झाड." आजोबा हळूच कुजबुजले. "तिथे मध साठवून ठेवला आहे, पण तो काढण्यासाठी आपल्याला बराच धूर करावा लागेल."

मग सर्वांनी मिळून बारक्या फांद्या आणि ओली पाने जमवून एक होळी पेटवली.

धुरामुळे मधमाशा शांत झाल्यावर आजोबा ऐनारच्या सायकलीवर तोल सांभाळून उभे राहिले आणि झाडापर्यंत पोचले. पोळ्याचे लहान लहान तुकडे काढून त्यांनी खाली टाकायला सुरुवात केली. सिल्व्हेस्टरच्या बाबागाडीत असलेले एक स्वच्छ दुपटे बेर्थाने पकडले होते त्यात ते सगळे तुकडे जमवून मेरी एलेनने चांगले बांधून घेतले. लंडहेगनने ते सगळे बाबागाडीत ठेवले. वादकांनी आनंदाने वाद्ये वाजवायला सुरुवात केली आणि हेर्मान भगिनी नाचू लागल्या.





आजोबांनी मग सगळ्यांना ताजी बिस्किटे, चहा आणि अर्थातच मध चाखण्यासाठी घरी बोलावले.

गाणी, नाच, भरपूर गप्पा, हास्यविनोद यात सगळे रंगून गेले.





आजोबा मेरी एलेनला हळूच आतल्या बाजूला घेऊन गेले आणि म्हणाले, “हे बघ बाळ, माझ्या वडिलांनी जे मला खूप वर्षांपूर्वी दाखवले होते, आणि जे त्यांच्या वडिलांनी त्यांना दाखवले होते, ते मी आता तुला दाखवणार आहे.”


तिच्या एका पुस्तकावर त्यांनी थोडासा मध टाकला आणि तिच्या कानात म्हणाले, “आता याची चव घे!”

मेरी एलेनने तिच्या पुस्तकावरील मधाची चव घेतली.

मग ते विचारपूर्वक तिला म्हणाले, “या पुस्तकाच्या आत देखील तेवढीच गोडी आहे! तसेच अदभूत अनुभव, माहिती आणि ज्ञान. पण हे सर्व काही सहज मिळत नाही. तुम्ही ते शोधायचे असते. मधमाशीचे झाड शोधायला आपण जसे तिचा पाठलाग करत गेलो होतो, तसाच पुस्तकाच्या पानांतून या सर्वाचा पाठपुरावा करावा लागतो!”

एवढे म्हणून आजोबा हसले आणि तिला एक पपी दिली.







त्या दिवसापासून मेरी एलेनने वाचायचा कधीच कंटाळा केला नाही. मिशिगन मधील मधमाशीमागे धावण्यातली मजा आणि मधाचा गोडवा हे सर्व आता तिला पुस्तकातून मिळू लागले आहे.